डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, संलग्न कृषि महाविद्यालये
संलग्न कृषि विद्यालये व ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा व अमरावती
येथील वैद्यकीय देयके व थकबाकीच्या देयता बाबत...

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## अर्थ प्रशासन विभाग

---

महत्वाचे

## परिपत्रक

जा.क्र.अप्रवि/अंदाज/वैदै/थकबाकी/२०२६-२७/ 01 दिनांक: ०१ एप्रिल, २०२६

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, संलग्न कृषि महाविद्यालये संलग्न कृषि विद्यालये व ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा व अमरावती येथील सर्व नियंत्रण अधिकारी, विभागप्रमुख,कार्यालय प्रमुख तसेच आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की, आपल्या कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यांचे वैद्यकीय देयके तसेच कोणत्याही प्रकारची थकबाकी निकाली काढण्यास्तव नियंत्रक यांचे वित्तीय मंजुरी घेणे वित्तीय अधिकार नियमपुस्तिकन्वये क्रम प्राप्त ठरते.

त्या अनुषंगाने आपल्या कार्यालयातील वैद्यकीय देयके तसेच कोणत्याही प्रकारची थकबाकी देयके निकाली काढण्यास्तव नियंत्रक यांची मंजुरी घेण्यात यावी. त्या करीता संबंधीत कार्यालयाने त्यांच्या आस्थापनेवरील कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यांची वैद्यकीय देयके किंवा थकबाकी देयके यांची सांक्षांकीत प्रत प्रस्ताव नस्तीसह नियंत्रक कार्यालयास सादर करण्यात यावेत. **तदनंतर अनुदानाच्या उपलब्धतेनुसार वैद्यकीय देयके किंवा थकबाकी देयकानकरीत वित्तीय मंजुरी आदेश या कार्यालयाकडून देण्यात येतील** . या वित्तीय मंजुरी आदेशाची प्रत देयका सोबत असल्याखेरीज, **कोणतेही वैद्यकीय देयके किंवा थकबाकी देयके पारीत करण्यात येणार नाहीत याची दक्षता घ्यावी**.

नियंत्रक
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

प्रत:-

१. मा.कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या माहितीस्तव.
२. मा.नियंत्रण अधिकारी (सर्व), डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या माहितीस्तव.
३. विभाग प्रमुख (सर्व)/ कार्यालयीन प्रमुख (सर्व)/ आहरण व संवितरण अधिकारी (सर्व) यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव.
४. प्रायार्च ..............................................................................
५. **वेतन व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला / नागपूर यांनी वैद्यकीय देयके किंवा थकबाकी देयके यांच्या सोबत नियंत्रक यांचे वित्तीय मंजुरी आदेश असल्याखेरीस देयक मंजूर तथा पारीत करु नयेत.**
६. प्रभारी अधिकारी, सेवार्थ प्रणाली कक्ष डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला / नागपूर यांनी देयकासोबत नियंत्रक यांचे आदेश असल्याबाबत पडताळणी करावी.
७. प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसारणाकरीता

प्रतिलिपी:-

मा.कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना मा.कुलगुरु महोदय यांच्या माहिती करीता सादर.

नियंत्रक
डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला